## संजीवन अभियांत्रिकी महाविद्यालयाला व्हॉलीबॉल स्पर्धेमध्ये विजेतेपद
## शिवाजी विद्यापीठ अंतर्गत लीड कॉलेज व्हॉलीबॉल स्पर्धा




**फोटो ओळ –**
**पन्हाळा : संजीवनच्या दोन्ही विजयी संघास बक्षिस देताना आप्पासो पल्लखे, प्रा. रणजीत इंगवले, सागर पाटील, विजय गव्हाणे व मान्यवर.**

**पन्हाळा : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठांतर्गत लीड कॉलेज आयोजित व्हॉलीबॉल स्पर्धा संजीवन अभियांत्रिकी महाविद्यालय, पन्हाळा येथे पार पडल्या. यामध्ये संजीवन अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मुलांच्या व मुलींच्या दोन्ही संघांनी प्रथम क्रमांक पटकावला.

या स्पर्धेतील मुलांचा पहिला सामना नानासाहेब महाडिक कॉलेज वि. संजीवन महाविद्यालय यांच्यात झाला. यामध्ये संजीवन ने विजय मिळवत उपांत्य फेरीत प्रवेश केला. उपांत्य फेरीमध्ये अशोकराव माने कॉलेज वि. संजीवन अशी लढत झाली यामध्ये संजीवन महाविद्यालयाने विजय संपादन करून अंतिम सामन्यांमध्ये धडक मारली. अंतिम सामना संजीवन महाविद्यालय वि. संजय घोडावत अभियांत्रिकी महाविद्यालय यांच्यामध्ये झाला. या सामन्यामध्ये संजीवन अभियांत्रिकी महाविद्यालयाने प्रथम क्रमांक पटकावला.

या स्पर्धेतील मुलींचा पहिला सामना तात्यासाहेब कोरे कॉलेज वि. संजीवन महाविद्यालय यांच्यात झाला. यामध्ये संजीवन ने विजय मिळवत अंतिम फेरीत प्रवेश केला. अंतिम सामना संजीवन महाविद्यालय वि.

संजय घोडावत अभियांत्रिकी महाविद्यालय यांच्यामध्ये झाला. या सामन्यामध्ये संजीवन अभियांत्रिकी महाविद्यालयाने प्रथम क्रमांक पटकावला.बक्षीस  वितरण समारंभ संजीवन कॉलेजचे प्रा. रणजीत इंगवले, आप्पासो पल्लखे, सागर पाटील, विजय गव्हाणे यांच्याहस्ते करण्यात आला.

पंच म्हणून अबीद मोकाशी, नूरमुहमद नागरजी, नितीन बहादुरे, जयंत कुलकर्णी, कपिल खोत यांनी काम पहिले. स्पर्धा यशस्वी करणेसाठी सौरभ भोसले, संग्राम पाटील, विजय पाटील व सागर पाटील यांनी सहकार्य केले. विजयी संघास क्रीडाशिक्षक प्रा. रणजीत इंगवले यांचे मार्गदर्शन लाभले. संजीवन अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन बी. वनरोट्टी, संजीवन ग्रुप ऑफ स्कूलचे चेअरमन पी. आर. भोसले, सहसचिव एन. आर. भोसले यांचे सहकार्य लाभले.